पिंपरी चिंचवड सहकारी बँक
मर्यादित पिंपरी

# पिंपरी चिंचवड सहकारी बँक मर्यादित पिंपरी

मुख्य कार्यालय : "शामा आर्केड", स. न. १११ मेन रोड काळेवाडी, पिंपरी, पुणे-४११०१७
फोन न. ७२७६०९६४३१/४३४ इमेल : admin@pcsbank.in वेबसाईट : www.pcsbank.in

## वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना
## (फक्त सभासदांकरिता)

बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरुवार, दिनांक २० जून २०२४ रोजी सकाळी ठीक ११.३० वा. आचार्य अत्रे सभागृह, संत तुकाराम नगर, (वाय.सी.एम. हॉस्पिटल जवळ) पिंपरी, पुणे-४११०१८ या ठिकाणी बँकेचे माननीय अध्यक्ष **श्री. शिरीष दिनकरराव देशपांडे** यांचे अध्यक्षतेखाली होणार आहे. तरी सदर सभेस आपण प्रत्यक्ष उपस्थित रहावे, ही विनंती.

## * सभेपुढील विषय *

१) मागील दिनांक २६ सप्टेंबर २०२३ या दिवशी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या सन २०२३-२४ च्या वार्षिक अहवालाची नोंद घेणे व वैधानिक लेखा परिक्षकांनी मान्यता दिलेल्या दिनांक ३१ मार्च २०२४ अखेरच्या ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजुरी देणे.

३) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात अंदाजापेक्षा जास्त केलेल्या खर्चास मान्यता देणे.

४) वैधानिक लेखापरिक्षण सन २०२३-२४ अहवालाची नोंद घेणे व सन २०२२-२३ च्या दोष दुरुस्ती अहवालास स्वीकृती देणे.

५) मा. संचालक मंडळाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता शिफारस केलेल्या शासनमान्य नामतालिकेतील वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे परवानगीने करणे व शासन नियमानुसार मेहनताना देणेबाबत मंजुरी देणे.

६) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत व कर लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविण्याचे अधिकार मा. संचालक मंडळ सभेस देणेबाबत मंजुरी देणे.

७) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५ (२) नुसार) सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात संचालक मंडळ सदस्य व त्यांचे कुटुंबीयांना दिलेल्या कर्जाच्या माहितीची नोंद घेणे.

८) सन २०२३-२४ या कालावधीत शासनमान्य एक रकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत बंद केलेल्या खात्यांबाबत संचालक मंडळ सभेने मंजुरी दिलेल्या प्रस्तावाची नोंद घेवून त्यास कार्योत्तर मान्यता देणे.

९) बँकेने तयार केलेले विविध इतर निधी राखीव निधीमध्ये जमा करणेस मान्यता देणे.

१०) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२३-२४ या वर्षाच्या नफा विभागणीस मान्यता देणे.

११) बँकेच्या २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.

१२) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐन वेळच्या विषयांचा विचार करणे.

सभेस सर्व माननीय सभासदांनी उपस्थित रहावे ही विनंती.

स्थळ : पिंपरी, पुणे-१७
दिनांक : ०६.०६.२०२४

मा. संचालक मंडळाचे सुचनेवरुन
सागर सिताराम ढवळे
(मुख्य कार्यकारी अधिकारी (प्र.)

## ✻ विशेष सूचना ✻

१) बँकेच्या पोटनियमाप्रमाणे सभेसाठी आवश्यक असणा–या गणसंखेच्या (कोरम) अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा त्याच दिवशी पूर्व घोषित वेळेनंतर अर्ध्या तासाने घेतली जाईल व त्या सभेस गणसंख्येचे (कोरमचे) बंधन असणार नाही.

२) ज्या सभासदांना सभेच्या विषयांबाबत प्रश्न विचारावयाचे असतील त्यांनी दि १८ जून २०२४ पर्यंत, मुख्य कार्यालय अथवा शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात अर्ज द्यावेत व अर्जामध्ये सभासद क्रमांक व संपूर्ण नाव नमूद करुन पाठवावेत. सभेच्या विषय पत्रिकेतील विषयांबाबतचे प्रश्न विचारात घेतले जातील.

३) वार्षिक सर्वसाधारण सभेची सविस्तर नोटीस व दि. ३१ मार्च २०२४ अखेर बँकेचा ताळेबंद, नफातोटा पत्रक व वार्षिक अहवालाची संपूर्ण माहिती मुख्यालयासह सर्व शाखांच्या नोटीस बोर्डवर व बँकेची वेबसाईट www.pcsbank.in वर सभासदांच्या माहितीसाठी प्रसिद्ध केली आहे.

४) सभासदांनी त्यांचे पत्त्यात बदल केला असल्यास तसेच संपर्क दूरध्वनी अथवा मोबाईल क्रमांक तसेच केवायसी कागदपत्रे याची अद्ययावत माहिती बँकेस द्यावी. आपले भाग दाखले घेऊन जावेत. तसेच सर्व सभासद खातेदारांनी आपली केवायसी पूर्तता करुन घ्यावी.

५) सन्माननीय सभासदांनी सभेस येताना कृपया आपला फोटो ओळखपत्राचा पुरावा (आधारकार्ड / पॅनकार्ड / मतदान ओळखपत्र / बँक पासबुक / शासकीय ओळखपत्र) सोबत आणावे त्याशिवाय सभेत प्रवेश दिला जाणार नाही.

६) ज्या सभासदांचे पाल्य इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षेत ७५% व त्यापेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. त्यांनी आपल्या पाल्याची गुणपत्रिका बँकेच्या मुख्य कार्यालय किंवा नजीकच्या शाखा कार्यालयात दिनांक १८ जून २०२४ पर्यंत पोहच करावी सभा स्थळी विध्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येईल.

७) सभासदांनी भाग भांडवलामध्ये रक्कम गुंतवणूक करुन बँक सदृढ करण्यास मदत करणेबाबत विनंती करण्यात येत आहे.

---

### वार्षिक सर्वसाधारण सभा सूचना

**INLAND LETTER**

पिंपरी चिंचवड सहकारी बँक
मर्यादित पिंपरी

If Undelivered Please return to

प्रेषक :

अध्यक्ष

**पिंपरी चिंचवड सहकारी बँक मर्यादित पिंपरी**

मुख्य कार्यालय : "शामा आर्केड", स. न. १११ मेन रोड,
काळेवाडी, पिंपरी पुणे ४११०१७
फोन न. ७२७६०९६४३१/४३४
इमेल : admin@pcsbank.in

To,